सहकारातूनसमृध्दीकडे

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

संकेतस्थळ: https://sahakarayukta.maharashtra.gov.in

# प्रसिध्दीपत्रक

सहकार विभागातील गट - क संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दि.०६/०७/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून विहीत मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची टी.सी.एस.आय.ओ.एन या कंपनीमार्फत दिनांक १४/०८/२०२३ व दिनांक १६/०८/२०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली आहे.

सहकारी अधिकारी श्रेणी-१, सहकारी अधिकारी श्रेणी-२ या पदांसाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र परिक्षा शुल्क उमेदवारांनी भरणा केलेली आहे. तथापी सदर दोन्ही पदांसाठी एकच ऑनलाईन परिक्षा टी.सी.एस-आय.ओ.एन कंपनीमार्फत आयोजित करण्यात आलेली होती.

तसेच उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व टंकलेखक या पदांसाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र परिक्षा शुल्क उमेदवारांनी भरणा केलेली आहे. तथापी सदर तीनही पदांसाठी एकच ऑनलाईन परिक्षा टी.सी.एस-आय.ओ.एन कंपनीमार्फत आयोजित करण्यात आलेली होती. याप्रमाणे सदर पदांसाठी स्वतंत्रपणे अर्ज व परिक्षा शुल्क दुबार/तिबार अदा केलेल्या उमेदवारांचे परिक्षा शुल्क परत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार ज्या उमेदवारांनी सदर पदांसाठी एकपेक्षा जास्त वेळा परिक्षा शुल्क भरणा केलेले आहेत अशा उमेदवारांची यादी सहकार आयुक्त कार्यालयाच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी सदर यादीतील उमेदवारांना या प्रसिध्दीपत्रकाद्वारे आवाहन करण्यात येते की, परिक्षा शुल्क परत करणेसाठी आपले बँक तपशीलाची **अचूक** माहिती खालील नमुन्यात djrpune.recruitment2023@gmail.com या ई-मेल वर दि.१९.०४.२०२४ पर्यंत पाठविण्यात यावी.

Applicant Banks Details

| Applicant Name | Applicant No | Applicant Address | Bank Name | Branch Name | Account No | IFSC Code |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

***(Applicant Name & signature)***

उमेदवारांनी वरील नमुन्यामध्ये कळविलेल्या बँक तपशीलानुसार त्यांचे बँक खात्यात परिक्षा शुल्क रक्कम परत केली जाईल. उपरोक्त विहीत नमुन्यातील अचुक माहिती या कार्यालयास दि.१९.०४.२०२४ पर्यंत आपल्या अर्जात नमुद केलेल्या ई-मेलद्वारे प्राप्त न झाल्यास व सदर परिक्षा शुल्क उमेदवारांना परत न मिळाल्यास त्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. तरी संबधीत उमेदवारांनी विहीत मुदतीत माहिती तात्काळ पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी. विहीत मुदतीनंतर आलेली माहिती विचारात घेतली जाणार नाही. याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

सहकार आयुक्त व निबंधक,

सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

दि.०४/०४/२०२४